# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०९/०७/२०२४ (मंगळवार) दुपार


---

## काटोल हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ०८/०७/२०२४ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय काटोल विभाग काटोल येथील स्टाफ पोस्टे काटोल हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, नगर परीषद काटोल समोर पिकअप गाडयांच्या मागे काही जुगारी इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळ खेळत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून सदर स्टाफ यांनी नगर परीषद काटोल जवळ जावून सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) राहुल भारतसिंग बावरी, वय १९ वर्ष, रा. शिख मोहल्ला काटोल २) संतोष महादेवराव बागवान, वय ३३ वर्ष, रा. सुसुद्री ता. कारंजा. जि. वर्धा ३) रघु दिंगाबर कोकाटे, वय २१ वर्ष, रा. पेठबुधवार काटोल, ४) शाहरूख निसार शेख, वय ३१ वर्ष, रा. गॅस गोडावुन जवळ सावरगांव रोड काटोल ५) धिरज संजय लोखंडे, वय २५ वर्ष, रा. अण्णाभाउ साठेनगर काटोल ६) फरार आरोपी नामे बादल वासुदेव ताकतोडे रा. काटोल ७) फरार आरोपी प्रशांत लांडगे रा. काटोल** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण १) ते ५) जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) ३ मोबाईल फोन व तास पत्ते एकुण किंमती १९,००० रूपये २) नगदी १६०० रूपये एकुण किंमती २०६००/—रू. रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे काटोल कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री. बापू रोहोम यांचे मार्गदर्शनात सपोनि शिवाजी नागवे, पोना रंजित रोकडे, नितीन लवटावार, पोशि गौरव बखाल, धुलसिंग आडे, परसराम केवटे यांनी पार पाडली.

# अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध धडक मोहीम

दिनांक ०७/०७/२०२४ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत प्रोव्हीशन रेडकामी पेट्रोलींग करीत असता सावनेर येथील मौजा पाटणसावंगी येथे यातील आरोपी नामे– राजेश माणिकराव मडावी वार्ड क्र ५ पाटणसावंगी याचे राहते घराची दारू बाबत झडती घेतली असता एका पांढऱ्या रंगाचे प्लास्टिक डबकी मध्ये अंदाजे १० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमत १०००/– रु चा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

तसेच मौजा पाटणसावंगी येथील आरोपी नामे– अतुल धुलीराम कामडी रा पाटणसावंगी याचे जवळील पिशवीची झडती घेतली असता त्यामध्ये १८० ml च्या २५ प्लास्टिक निपा प्रत्येकी किंमती ७० रुपये प्रमाणे १७५० रुपयाचा मुद्देमाल अवैदयरित्या मिळून आल्याने जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

दि. ०८/०७/२०२४ रोजी पोस्टे कळमेश्वर अंतर्गत डोरली शिवार येथे आरोपी राजु भगवान कांबळे, वय ६३ वर्ष रा. डोरली ता. काटोल जि. नागपुर डोरली शिवार याचे घराची दारूबाबत घरझडती घेतली असता आरोपीचे ताब्यातून देशी दारूच्या १८० एम.एल ने भरलेल्या १२ निपा एकुण २१६० एम.एल किंमती ९६० रू चा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोस्टे नरखेड अंतर्गत मौजा खरसोली येथे राहणारा इसम धनराज शामराव गजभिये रा. खरसोली तह. नरखेड हा त्याचे राहते घरी अवैधरीत्या देशी दारू बाळगुन विक्री करत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून आरोपीचे घराची घरझडती घेतली असता त्याचे ताब्यातून १० निपा देशी दारू प्रत्येकी ९० एम एल क्षमतेचे ३५० रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर